## ५. प्रतिंनिधीत्वाची संकल्पना


**प्र.१ अ ) दिलेल्या प्रतयांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा:**
1) प्राचीन ग्रीसमधील अथेन्स नगरराज्यात **प्रत्यक्ष लोकशाही** होती.
२) जगातील सर्वांत प्राची प्रतींनिधिक सभा **हाऊस ऑफ कॉमन्स** आहे.

**ब ) दिलेल्या विधांनासाठी समर्पक संकल्पना लिहा :**
१) राज्यकारभार चालवण्यासाठी लोक काही जणांची निवड करतात ती पद्धत म्हणजे **प्रतींनिधिक लोकशाही .**

**क) गटात न बसणारा शब्द ओळखा :**
१) भारतीय राष्ट्रीय कामगार संघटना, अखिल भारतीय किसान सभा, नॅशनल स्टुडेंट योनियन ऑफ इंडिया, इंडियन नॅशनल कोंग्रेस.
**उत्तर : इंडियन नॅशनल कोंग्रेस**
उत्तर : **प्रजासत्ताक आयर्लंड**

२) भारत, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, अर्जेंतींना
उत्तर : **अर्जेंतींना**

**प्र.२ पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा (उत्तर)**




**प्र.३ सहसंबंध स्पष्ट करा.**
**१) शासकीय संघटना आणि बिगर-शासकीय संघटना.**

**उत्तर :** (१) बिगर-शासकीय संघटना विविध समाजसेवी उपक्रम हाती घेत असतात.
(२) शासकीय संघटना लोककल्याणाचे व विकासाचे उपक्रम हाती घेत असतात.

(३) अलीकडच्या काळात शासकीय उपक्रम राबवण्याची जबाबदारी बिगर-शासकीय संस्थांकडे सोपवली जाते.

(४) त्यासाठी शासन त्यांना अनुदान व तांत्रिक साहाय्य उपलब्ध करून देत असते.

**प्र.४ आपले मत नोंदवा.**
**(२) दबाव गट हे राजकीय पक्षांपेक्षा भिन्न असतात. आपले मत नोंदवा.**
**उत्तर :** (१) राजकीय पक्ष राजकीय प्रक्रियेचा एक घटक असतात. सत्तासंपादन करण्याच्या उद्देशाने ते निवडणुकीत सहभागी होतात. दबाव गट राजकीय प्रक्रियेत प्रत्यक्षरीत्या सहभागी होत नसले, तर ते राजकीय निर्णयप्रक्रियेवर प्रभाव टाकण्यासाठी प्रयत्नशील असतात.
(२) दबाव गट जरी निवडणूक लढवत नसले तरी त्यांच्या हितसंबंधांची जोपासना करणाऱ्या राजकीय पक्षांना ते अर्थसाहाय्य करतात. दबाव गटांद्वारा उपकृत असलेले राजकीय पक्षांचे लोकप्रतिनिधी वास्तव अर्थाने दबाव गटांचे प्रतिनिधित्व करतात.
(३) राजकीय पक्षाची उद्दिष्टे व्यापक स्वरूपाची असतात आणि समाजातील विविध गटांचे ते प्रतिनिधित्व करतात. याउलट दबाव गटांची उद्दिष्टे मर्यादित असतात. शासकीय धोरणावर प्रभाव टाकून आपल्या गटातील व्यक्ती/संस्था यांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्याकरिता ते प्रयत्नशील असतात.
(४) फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री,कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज, भारतीय किसान यूनियन, शेतकरी संघटना, स्वाभिमानी शेतकरी संघटना हे काही प्रभावी गट भारताच्या राजकीय प्रक्रियेत कार्यरत आहेत.
**प्र.५ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**
**(१) प्रतिनिधित्वाचा अर्थ सांगून प्रतिनिधित्वाच्या पद्धती स्पष्टकरा :**
**[ मुद्दे : (अ) प्रतिनिधित्वाचा अर्थ (ब) निवडणुकीचा अर्थ (क) नेमणूक (ड) बिगर-शासकीय]**

**उत्तर : (अ) प्रतिनिधित्वाचा अर्थ :** आज जगात अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधिक लोकशाही प्रचलित आहे. राज्यकारभार चालवण्याची जबाबदारी जनता त्यांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींकडे सोपवते.प्रतिनिधित्व याचा अर्थ वेळोवेळी होणाऱ्या निवडणुकांत मतदार ज्या व्यक्ती कडे राज्यकारभाराची जबाबदारी सोपवतात, त्यांना प्रतिनिधी असे म्हणतात आणि ते प्रतिनिधी जे कार्य करतात त्यास प्रतिनिधित्व असे म्हणतात.

**(ब) निवडणुकीचा अर्थ :** निवडणूक म्हणजे मतदारांद्वारा केली जाणारी लोकप्रतिनिधींची निवड करण्याची प्रक्रिया होय. आपला प्रतिनिधी कोण असावा ते ठरवण्याचा अधिकार लोकांना असतो. त्यासाठी वापरले जाणारे माध्यम म्हणजे निवडणूक. निवडणुकीदवारा आपला प्रतिनिधी कोण असावा हे मतदार ठरवतात. लोकशाहीमध्ये सत्ता संपादन करण्यासाठी विविध राजकीय पक्ष निवडणूक लढवतात. त्यांपैकी कोणत्या राजकीय पक्षाला सत्ता सोपवायची हे मतदार ठरवतात. ते या राजकीय पक्षाच्या बहसंख्य उमेदवारांची

निवड करतात. नुकतीच लोकसभेची १७ वी निवडणूक संपन्न झाली. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे ३०० हून अधिक उमेदवार मतदारांनी निवडून दिले. म्हणजेच या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे राज्यकारभाराची जबाबदारी सोपवण्याचा निर्णय भारतीय जनतेने घेतला आहे.

**(क) नेमणूक :** सन १८६१ च्या कायद्याद्वारे भारतात प्रातिनिधिक शासनपद्धती सुरू झाली. मात्र लोकप्रतिनिधींची मतदात्यांनी निवड करण्याऐवजी भारताचे गव्हर्नर-जनरल व गव्हर्नर त्यांची नियुक्ती करीत असत. भारताच्या राज्यसभेच्या १२ सदस्यांची नेमणूक भारताचे राष्ट्रपती करतात. विविध शासकीय आस्थापनांतील सदस्यांची नेमणूक/नियुक्ती शासनाद्वारा करण्यात येते.
**(ड) बिगर-शासकीय :** स्थानिक स्तरावरील राज्यकारभारात नागरी समुदायाला सहभागी करून घेण्याचे उद्देशाने बिगर-शासकीय सदस्यांचे नामनिर्देशन महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत या संस्थांत करण्यात येते. आपणास प्रतिनिधित्व प्राप्त व्हावे यासाठी विविध हितसंबंधी गट व दबाव गट प्रयत्नशील असतात.

**(२) मतदारांना मतदानासाठी कशा प्रकारे प्रोत्साहित करता येईल, यासाठी उपाय सुचवा.**
**उत्तर :** मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी पुढील
उपाय योजता येतील
(१) निवडणूक आयोगाने निवडणुकांचे महत्त्व विशद करणारा लोकशिक्षणाचा कार्यक्रम आयोजित करावा.
(२) स्थानिक स्तरावर कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या साहाय्याने खेडोपाड्यांत लोकशिक्षणाचे उपक्रम हाती घ्यावेत.
(३) ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी ग्रामस्थांना निवडणुकीत मतदान करण्यास प्रवृत्त करावे.
(४) १००% मतदान ज्या गावात होईल, त्या गावांना शासनाने प्रोत्साहनपर अनुदान दयावे.
(५) चित्रपट, दूरदर्शन आणि 'सोशल मीडिया' द्वारा निवडणुकांचे महत्त्व विशद करून जनजागृती करावी.